


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७२२ . वा | शुक्रवार | दि. २९ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्ह्याच्या राजकारणात आला मोठा भूकंप

## आमदार संजय गायकवाड यांनी केला लोकसभेसाठी अर्ज दाखल


**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्ह्याच्या राजकारणात भूकंप आल्याचे दिसून येत आहे. बुलढाणा लोकसभेसाठी महाविकास आघाडीने आपला उमेदवार जाहीर केला आहे यामध्ये वंचित बहुजन आघाडी यांनी सुद्धा आपला उमेदवार जाहीर केला मात्र महायुतीमध्ये असलेले भाजप राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचा उमेदवार अजून निश्चित झाला नसून मात्र बुलढाणा जिल्ह्यात राजकारणामध्ये आज मोठा भूकंप आल्याचे दिसून आले.आज दि २८ मार्च रोजी आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांच्या या अर्जाने बुलढाणा लोकसभेच्या निवडणूक रणांगणामध्ये गोंधळ निर्माण झाला. बुलढाणा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे पोहोचून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. काही महिन्या आधीच स्वतः आमदार संजय गायकवाड यांनी खासदार जाधव भाजपच्या सर्व तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे म्हटले होते त्याआधी आमदार गायकवाड यांच्याकडून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे संकेत देणारे पोस्ट सुद्धा व्हायरल करण्यात आली होती. त्यामुळे आता बुलढाणा लोकसभा निवडणूक रिंगणामध्ये मोठी खेळी होण्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता निवडणूक मध्ये कोणाचा फायदा व कोणाचे नुकसान असे होताना दिसणार आहे त्यामुळे जिल्हा वासियांचे लक्ष लागून आहे. शिंदे गटाकडून उमेदवारीची अधिकृत यादी जाहीर झालेली नसताना आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला मात्र यावर खासदार प्रतापराव जाधव यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की त्यांना एबी फॉर्म मिळाला असेल त्यामुळे त्यांनी अर्ज भरला असेल अशी खोचक टिपणी खासदार पदापर्यंत जाधव यांनी केली आहे. बुलढाण्यात महायुतीचा मेळावा आहे त्यांची तयारी सुरू आहे त्या संदर्भात आमदार गायकवाड यांच्याशी सकाळीच बोलणे झाले होते मात्र अचानक त्यांनी अर्ज भरण्याचा निर्णय का घेतला हे माहित नाही त्यांचं त्यांनाच विचारा असे सुद्धा खासदार प्रतापराव जाधव यांनी सांगितले

# अखेर शेवटी लोकसभेची उमेदवारी प्रतापरात जाधव यांना जाहिर...

**जनसंचलन/बुलढाणा**



अखेर शेवटी बुलढाणा लोकसभेचे उमेदवारी खासदार प्रतापराव जाधव यांना मिळाली आहे.आज उद्या परवा म्हणता अखेर दि २८ मार्च रोजी गुरूवारच्या मुहूर्तावर बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीच्या उमेदवाराची घोषणा झाली. १५ वर्षे खासदाराकी भोगल्यानंतर पुन्हा एकदा प्रतापराव गणपतराव जाधव यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खा जाधव यांच्या नावाची घोषणा करून बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी कोण उमेदवार राहील या चर्चांना आता पूर्णविराम दिला आहे.सचिव शिवसेना संजय मोरे यांचा काल शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथून ८ उमेदवारांचा प्रसिध्दी पत्रकांद्वारे माहिती देण्यात आली आहे.या मध्ये बुलढाणा लोकसभेसाठी प्रतापराव जाधव यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.भाजप नेतृत्वाने जिल्ह्यातील भाजप कार्यकर्ते,पदाधिकारी यांचे म्हणणे निवडणूकपूर्व सर्वे सर्व काही कोलून लावत युती धर्माच्या नावाखाली हा मतदारसंघ पुन्हा शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ताब्यात देण्यात आला आहे.

# बुलढाण्यातून या वेळी लोकसभेत भाजपचाच खासदार पोहोचणार

## जिल्हाध्यक्ष मांटे यांनी सिटी न्यूज दैनिक जनसंचलनशी बोलताना व्यक्त केला विश्वास

**जनसंचलन/बुलढाणा**



आपल्या लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज कोणीही दाखल करो, परंतु एक भाजपचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून मला विश्वास आहे की, यंदा बुलढाणा लोकसभा मतदारसंघ हा भाजपलाच मिळणार आहे आणि भाजपचाच खासदार या मतदारसंघाचे प्रश्न लोकसभेत जोरकसपणे मांडणार. या वेळी जागा भाजपला मिळण्यासंदर्भात आम्ही भाजप कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना पक्षश्रेष्ठींकडे पोहोचवल्या आहेत. त्यामुळे पक्षश्रेष्ठी जिल्ह्यातील हजारो कार्यकर्त्यांच्या व लाखो भाजपच्या मतदारांच्या भावना समजून निर्णय घेईल,अशा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांनी व्यक्त केला. आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करून आपली दावेदारी ठोकल्यानंतर भाजप नेतृत्वाच्या भावना जाणून घेण्यासाठी सिटी न्यूज दैनिक जनसंचलनच्या वतीने भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांच्याशी संवाद साधला, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी बोलताना मांटे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील भाजपचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते पक्षश्रेष्ठींकडे जोरकसपणे बुलढाणा लोकसभा मतदारसंघ या वेळी भाजपलाच मिळावा व येथून कमळ चिन्हावरच उमेदवार लढावा, अशी मागणी करीत आलेले आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या भावना काय आहेत आणि किती तीव्र आहेत, यासंदर्भात भाजपचे राज्यातील व देशातील पक्षश्रेष्ठी खूप चांगल्याप्रकारे जाण ठेवून आहेत. त्यामुळेच या वेळी हा मतदारसंघ भाजपला मिळणार याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. आज बुलढाणा जिल्ह्यात व लोकसभा मतदारसंघात भाजप अत्यंत मजबूत स्थितीत आहे. आज जिल्ह्यात भाजपचे सत्तेत तीन आमदार व माजी दोन आमदार आहेत. याशिवाय जिल्ह्यातील पाच पंचायत समित्यांचे सभापती, ४ पंचायत समित्यांचे उपसभापती, पाच नगराध्यक्ष, तसेच जिल्ह्यातील विविध स्वराज्य संस्थांचे सदस्यही आहेत. जिल्ह्यात भाजप अत्यंत मजबूत स्थितीत आहेत. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा चेहरा आहे. सबका साथ, सबका विकास हे ब्रीद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशभरात काम करीत आहेत. त्याचा लाभ जिल्ह्यातही भाजपला मोठ्या प्रमाणावर आहे. दुसरे पक्ष फुटले असतील किंवा त्यांची ताकद क्षीण झाली असेल, परंतु आजही भारतीय जनता पक्ष जिल्ह्यात आणि देशात अभेद्य व अविजित आहे. त्यामुळे आमचा हा प्रयत्न आहे की, जिल्ह्यातही भाजपच्या कमळ या निशाणीवर एखादा विकासात्मक व कोणाचीही नाराजी नसलेला चेहरा उमेदवार असावा, जेणेकरून पंतप्रधान मोदी यांचे ४०० पार चे स्वप्न साकार करण्यात जिल्ह्याचा वाटा असावा, अशी आमची इच्छा आहे. बुलढाणा जिल्हा हा माँ जिजाऊंचे जन्मस्थान असलेला जिल्हा आहे. या जिल्ह्याची मातृतीर्थ म्हणून ओळख आहे. याशिवाय जिल्ह्यात लोणारचे जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर आहेत. शेगावचे श्री संत गजानन महाराज संस्थान असो की, देऊळगावराजाचा प्रतितिरुपती बालाजी यासारखी अनेक तीर्थस्थाने देखील आहेत. जिल्ह्यात पर्यटन असो की तीर्थाटन यासाठी अत्यंत पोषक असे वातावरण आहे. या सर्व पर्यटनस्थळांचा-तीर्थस्थळांचा विकास, जिल्ह्यात रस्त्यांचा विकास, रेल्वेचा विकास, औद्योगिक विकास करण्यासाठी भाजपकडे अनेक सक्षम उमेदवार आहेत. त्यामुळे आम्ही पूर्णपणे आश्वस्त आहोत की, बुलढाणा लोकसभा मतदारसंघ हा भाजपकडेच असणार आहे आणि येथील भाजपचा जो कोणी उमेदवार असेल, पक्षश्रेष्ठी ज्या ही व्यक्तीच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकतील, त्याला मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी भाजपचे सर्व कार्यकर्ते आपल्या जिवाचे रान करतील, तसेच जिल्ह्यातील मतदार मोठ्या मताधिक्याने भाजपचा उमेदवार निवडून लोकसभेत पाठवतील व विकासाचे नवे पर्व जिल्ह्यात सुरू होईल, असा ठाम विश्वास डॉ. गणेश मान्टे यांनी व्यक्त केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नांदुरा अर्बन बँकेचे तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेल्या पांडेंनी केले बँकेचे कोटीचे नुकसान?

## आरबीआय आणि सहकार खात्यांनी कारवाई करण्याची गरज!

**जनसंचलन/ नांदुरा**

नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.गेल्या काही महिन्यापासून अनेक गैरप्रकाराने वादग्रस्त ठरली आहे, नांदुरा अर्बन बँकेच्या गैरकारभाराविरुद्ध अनेक तक्रारी झालेल्या आहेत, तसेच मागील वर्षात बँकेच्या गैरकारभाराविरुद्ध दिनांक २०/०३/२०२३ ते २३/मार्च/२०२३ असे चार दिवस जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण झाले होते, त्यामध्ये जिल्हा उपनिबंधक साहेब बुलढाणा यांनी दिलेल्या पत्रानुसार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेला तत्कालीन अध्यक्षांनी अनेक गंभीर स्वरूपाचे आरोपावरून दिनांक २९/०३/२०२३ रोजी निलंबित केले आहे. तेव्हा पांडे प्रोसिडिंग बुक घेऊन पळून गेल्याची तक्रार तत्कालीन अध्यक्षांनी पोलीस स्टेशन नांदुरा येथे दिली होती, त्याची बातमी दैनिक लोकमत, दैनिक विदर्भ मतदार, दैनिक भास्कर व इतर ही साप्ताहिकान मध्ये ठळक बातमी प्रकाशित झालेली होती. परंतु तरी सुद्धा निलंबित मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेंनी या निलंबनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवली, तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे आज रोजी ही सभासदांची गैरवर्तवणूक करीत असून उद्धट भाषा वापरत असल्याचे अनेक सभासद तक्रार करीत असतात, सभासदांनी तक्रार केल्यास त्यांची तक्रार आजही पांडेच्या दबावामुळे संबंधित आवक जावक कर्मचारी घेत नाही आणि तत्कालीन अध्यक्षांनी गैरवर्तुनुक व इतर गंभीर आरोपावरून निलंबन केलेल्या पांडे कर्मचारी असून देखील सभासदांना देख लूंगा असे तक्रार कर्त्यांना धमकावित असल्याची माहिती सभासद देतात, तसेच पांडे कनिष्ठ असल्यावरही व पात्र नसतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती कशी काय देण्यात आली ही सभासदांच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब सिद्ध होत आहे, तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे आज रोजी ही मग्रुरीने वागत असून सभासदांनी मागितलेली माहिती देत नाही, तसेच सहकार आयुक्त पुणे यांचे सभासला माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था १९६० चे कलम ३२ नुसार माहिती देण्यात यावी, असे पत्र असल्यावरही सहकार आयुक्ताच्या पत्रालाही केराची टोपली दाखवत आहे, तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला पांडे माहिती का देत नाही ? बँकेत काही गैरप्रकार , भ्रष्टाचार किंवा आणखी काही प्रकार तर सभासदांना अंधारात ठेवून झालेलेत नाहीत ? याची दाट शंका आहे कारण माहिती न देण्याचे कारण काय हे अनेक वेळा वृत्तपत्रातून ही प्रसिद्ध झाल्यावर ही कुठल्याही खुलासा करण्यात आलेला नाही किंवा माहिती देण्यात आलेली नाही,

इतकेच काय आमसभेची विषय पत्रिकेवरुन माहिती एका सभासदांनी मागूनही त्याला ती न देता कोर्टात जा अशी उद्धट भाषा वापरल्यामुळे ते प्रकरण कोर्टात दाखल आहे, पांडे सूडबुद्धीने वागत असून बँकेचे नुकसान करीत आहे, विनाकारण कोर्ट कचेरी मध्ये प्रकरण दाखवून दाखल करून स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थापायी सभासदांना कोर्टात जाण्यास बाध्य करीत आहे, किंवा त्याच्यावर बँकेचा फंडातून स्वतःच्या स्वार्थासाठी प्रकरणे दाखल करीन अशी मग्रुरी करीत असून तक्रार कर्त्याला धमक्या देत आहे, आणि त्याला अध्यक्ष व संचालक मंडळाचा पाठिंबा आहे काय ? असल्यास कोर्टात दाखल केलेल्या किंवा झालेल्या प्रकरणावर बँकेतून किती खर्च झाला त्याची माहिती प्रसिद्ध करावी किंवा सभासदांना द्यावी अशी मागणी सभासदांची आहे, विशेष म्हणजे मागील संचालक मंडळातील काही संचालकांनी राजीनामा दिल्यावरही त्यांनी बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषद घेण्यामुळे बँकेच्या काही कोटींच्या ठेवी काढण्यात आल्या व बँकेचे गुंतवणूक केलेला शासकीय रोखातून मदतीपूर्वी विड्रॉल झाल्यामुळे कोटीचे नुकसान झाले असे अहवालामध्ये नमूद आहे, यास पांडे जबाबदार असून पांडेवर कारवाई करून त्यांचे कडुन नुकसान वसूल करण्याची मागणी सभासद करीत आहे, अनेक वेळा तक्रारी व वृत्तपत्रात





बातमी प्रकाशित होऊन देखील सहकार आयुक्त पुणे किंवा रिझर्व बँकेने कारवाई का केली नाही? हा एक सभासदा करिता दुर्दैवयाचा विषय असून संशोधनाचा देखील आहे एवढे मात्र खरे! (क्रमशः) तत्कालीन अध्यक्षांनी उपोषणामुळे निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे स्वतःच्या हेकेखोर, मग्रुरीपणामुळे बँकेचे नुकसान करीत आहे, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था १९६० चे कलम ३२ अंतर्गत माहिती न देण्यात आल्यामुळे एका सभासदांनी सहकार न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे, त्याच्या कोर्ट खर्च ,वकील फी इत्यादीचा भुर्दंड बँकेला पडत आहे, विशेष म्हणजे वृत्तपत्राला वास्तववादी बातम्या प्रकाशित झाल्यामुळे पांडेंनी चिडून अनेक नोटिसेस व कोर्ट खर्च, वकिली फी इतर खर्चापोटी बँकेला खर्च करावा लागत आहे, जर सभासदांच्या तक्रारीवरून कार्यवाही करण्यात आली असती किंवा त्यांना माहिती देण्यात आली असती तर या बाबीवर खर्चही झाला नसता व बँकेचा गैरकारभारही चव्हाट्यावर आला नसता पण या सर्व पांडेच्या निर्णयाला अध्यक्ष व संचालक मंडळ समर्थन का करीत आहे? की पांडेच्या पुढे हातबल झाले की तेरी भी चूप और मेरी भी चूप असे काही प्रकरण आहे याचा खुलासा होणे सभासद, ठेविधारांच्या हिताकरिता अत्यावश्यक आहे?

# सैलानी यात्रेतील भाविकांसाठी २४ तास आरोग्य सेवा, विविध पथकांची नियुक्ती...

**जनसंचलन/पिंपळगाव सराई**

सैलानी बाबाच्या यात्रेला येणाऱ्या भाविकांसाठी रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत यात्रेत २४ तास आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गीते, साथरोग अधिकारी प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते यांच्या मार्गदर्शनाखाली सैलानी यात्रेत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकारी, पाच आरोग्य सहायक, दोन आरोग्य सेविका, दोन परिचारक, एक आरोग्य सेवकांची नेमणूक करण्यात आल्याचे रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. उस्मान शेख यांनी सांगितले. सैलानी यात्रेत पिण्यासाठी टँकरद्वारे जाणारे





पाणी शुद्धीकरण करून पाठवले जात आहे. तसेच भाविकांना आरोग्य सेवा देण्यासाठी मुबलक औषधीसाठा, तीन ॲम्बुलन्स तैनात आहेत. सैलानी यात्रेतील हॉटेल, खानावळ मधील पाणी शुद्धीकरण करण्यासाठी दोन मोबाइल पथकेही कार्यान्वित करण्यात आली आहे. गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी सैलानी यात्रेत व्यापाऱ्यांची दुकानांची संख्या कमी झाली आहे. तसेच होळीला सुद्धा गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी भाविकांची संख्या कमी होती. सैलानी बाबाच्या यात्रेत यावर्षी भाविकांची संख्या कमी असल्यामुळे व्यापाऱ्यांचे व्यवसाय होत नसल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये सुद्धा नाराजी दिसून येत आहे.

# चिंचोली सांगळे शाळा लोणार तालुक्यातून प्रथम...

**जनसंचलन/ देऊळगाव कुंडपाळ**

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार पंचायत समितीच्या देऊळगाव कुंडपाळ केंद्रांतर्गत असलेल्या चिंचोली सांगळे जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळेने पाककृती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.हि लोणार वासियांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. शाळेमध्ये सुंदर हस्ताक्षर, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, शैक्षणिक साहित्य निर्मिती आदी विविध गुणवत्तापूरक उपक्रम राबविण्यात येतात. उच्च श्रेणी मुख्याध्यापक संजय जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात येतात. शाळेतील शिक्षक, शालेय मंत्रीमंडळ यांच्या पुढाकाराने दर बुधवारी शालेय मंत्रीमंडळात ठराव घेतला जातो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्ये, सामाजिक एकोपा, निर्णय क्षमता, व्यवस्थापन व कौशल्य विकसित होऊन शाळेबद्दल आवड निर्माण होते. तसेच पटसंख्या वाढीसाठी हा उपक्रम पूरक आहे. लोकसहभाग व शिक्षक सहभागातून शाळेला २०० फूट लांबीची संरक्षण भिंत बांधली गेली आहे. लोकवर्गणी व शिक्षकवर्गणीतून महान व्यक्तींचे फोटो प्रत्येक वर्गात लावण्यात आलेले आहेत. या विविध उपक्रमांना केंद्राचे केंद्रप्रमुख रामप्रसाद कायदे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शाळेच्या मैदानात लाल मातीच्या ट्रॉल्या टाकून मैदान खेळायोग्य व बागेयोग्य बनविण्यात येणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महिलेच्या विनयभंगप्रकरणी एकास दोन वर्षे सक्तमजुरी बुलढाणा न्यायालयाचा निकाल



**जनसंचलन/बुलडाणा**

देऊळगाव राजा तालुक्यातील जुमडा शिवारात एका महिलेचा जवळच्या नातेवाइकाने विनयभंग केल्याप्रकरणी बुलढाणा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन. मेहरे यांनी एकास दोन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. २६ मार्च रोजी हा निकाल देण्यात आला. देऊळगाव राजा तालुक्यातील जुमडा शिवारात ३ फेब्रुवारी २०१९ रोजी एक महिला शेतात काम करण्यासाठी जात असताना तिच्या जवळच्या नातेवाइकाने पाठीमागून येत वाईट उद्देशाने महिलेस स्पर्श करत तिचा विनयभंग केला. पीडितेने आरडाओरड केली असता शेजारील शेतात काम करणाऱ्या व्यक्ती तिच्या मदतीला धावून आल्या. तेव्हा आरोपीने तेथून पळ काढला होता. याप्रकरणी पीडित महिलेने देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यावरून पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर प्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध देऊळगाव राजा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. तेथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. के. मुटकुळे यांनी आरोपीस प्रकरणात दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास दोन महिन्यांची साधी कैद अशी तरतूदही या निकालात होती. प्रकरणी या विरोधात आरोपीने याने जिल्हा व सत्र न्यायालयात देऊळगाव राजा येथील न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील दाखल केले होते. या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायाधीश (१) आर. एन. मेहरे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. त्यात आरोपीच्या वकिलांनी व सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील एस.पी. हिवाळे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यामुळे पीडिता, प्रत्यक्षदर्शी पुरावा तसेच डॉक्टरांचा पुरावा व तपास अधिकारी यांच्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश (१) आर.एन. मेहरे यांनी देऊळगाव राजा न्यायालयाचा १९ मे २०२२ रोजीचा न्यायनिर्णय कायम करून आरोपीस दोन वर्षांची सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने साधी कैद अशी शिक्षा २६ मार्च २०२४ रोजी सुनावली.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरूण रोड, बुलढाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# सां बा विभागाचे अभियंता बालाजी काबरा यांची खातेनिहाय चौकशी करून कारवाईची मागणी !



**जनसंचलन/ दुसरबीड**

दुसरबीड मलकापूर पांगरा - ते साखरखेर्डा या २२२ क्रमांक डांबर रस्त्याच्या कडेलाच एका नामांकित कंपनीने सदर सार्वजनिक बांधकाम देऊळगाव राजा यांची कुठल्याही प्रकारची परवानगी घेतली नसताना रस्त्याच्या कडेला केबल टाकण्यासाठी जेसीबी ने मोठ्या प्रमाणात रस्त्याचे खोदकाम केलेले आहे ,सदर कंपनीने कुठलीही परवानगी घेतली नसताना खोदकाम केले कसे याबाबत कार्यकारी मुख्य अभियंता बालाजी काबरा यांना सर्व माहिती वारंवार फोन द्वारे बुलढाणा चौफेर चे मुख्य संपादक गंगाराम उबाळे यांनी टाकली होती परंतु काबरा यांनी कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही सदर हा प्रकार गेल्या दोन महिन्यापासून सुरू असून काबरा यांनी आर्थिक व्यवहार केल्याची चर्चा आहे,तसेच शेंदुर्जन ते तांदूळवाडी फाट्या पर्यंत पाच वर्षांपूर्वी सामाजिक वनीकरण विभागाने रस्त्याच्या दुतर्फा बाजूला वृक्ष लागवड केली होती अजूनही दुतर्फा बाजूला दाट गर्द झाडे आपल्याला दिसतात परंतु सदर कंपनीने झाडे तोडण्याची कुठलीही परवानगी घेतलेली नसताना ५० पेक्षा जास्त वृक्षाची तोड केली आहे एवढे सर्व घटना घडलेली असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे बालाजी काबरा गप्प कसे हा प्रश्न निर्माण होत आहे त्यामुळे त्यांची आर्थिक चौकशी करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी बुलढाणा चौफेअरचे मुख्य संपादक गंगाराम उबाळे यांनी मुख्य अभियंता बुलढाणा यांना दिनांक २७ मार्च रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे,

# २५ वर्षीय विवाहितेचा गळा दाबून खून आरोपी नवरा, सासू व सासरा पोलिसांच्या ताब्यात

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा स्थानिक पोलीस स्टेशनच्या हद्दीतील तुळजापूर येथील २५ वर्षीय विवाहितेचा गळा दाबून खून केल्याप्रकरणी नवरा, सासू-सासरे यांच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर घटना २७ मार्च रोजी दुपारी घडली आहे. याबाबत मृतक विवाहितेच्या आईने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की स्वाती हीचे लग्न सन २०१९ मध्ये तुळजापुर ता. देऊळगांव राजा येथील दिपक भगवान तिडके यांचे सोबत समाजाचे रिती रिवाजाप्रमाणे झाले होते. तेव्हापासुन ती तीचे सासरी तुळजापुर येथे राहते. तिला एक चार वर्षाचा शिवांश नावाचा मुलगा आहे. तिचे व तिचा पती दिपक यांचेत घरगुती कारणावरुन नेहमी वाद होत होते. लग्न झाल्यानंतर सात महीन्यातच तिचे पतीने त्याचे आई वडील यांचे सांगणेवरुन व तीचे चारित्र्यावर संशय घेवुन मुलगी स्वाती हीला मारहाण केल्याने तिला माहेरी चिरबंदी दे राजा येथे घेवून आलो होतो. तेव्हा ती अडीच वर्ष माहेरीच होती. त्यानंतर नातेवाइकांचे मध्यस्थीने तीला नांदवणे करीता सासरी पाठविण्या करीता तिचे पती दिपक याचेकडुन बॉन्ड पेपरवर लीहून घेवून




यांचेत वाद मिटवुन तिला तिचे सासरी पाठवून दिले होते. त्यानंतर २७ मार्च रोजी दुपारी ०२.३० वा सुमारास स्वातीचा नवरा सासू-सासरे यांनी घरात गळा दाबून तिचा खून केला व मृत्यूनंतर तिच्या तोंडात विषारी द्रव्य टाकले व तिला सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची फिर्याद गं. भा. जमुनाबाई लक्ष्मण खांडेभराड वय ६४ वर्ष यांनी दिली आहे. स्वाती हिला घरगुती कारण व तीचे चारित्र्यावर संशय घेवुन तिचा पती दिपक भगवान तिडके, सासु सौ. जिजाबाई तिडके, सासरे भगवान शामराव तिडके यांनी तिचा गळा दाबुन ठार केल्याने फिर्यादीमध्ये म्हटले आहे. या तक्रारीवरुन सिंदखेड राजा पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता १८६० अन्वये ३०२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार ब्रह्मदेव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप यांनी गुन्हा दाखल होताच तात्काळ आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# तलाठ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न; ४५ व्यक्तींविरोधात पोलिसांत गुन्हा

**जनसंचलन/दुसरबीड**

तालुक्यातील निमगाव वायाळ येथील पूर्णा नदीमध्ये तीन ते चार ट्रॅक्टरमध्ये विना-परवानगी रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती २६ मार्च रोजी रात्री गस्तीवर असलेल्या महसूल विभागाच्या पथकाला मिळाली. या पथकाने घटनास्थळी धाड टाकली असता दोन तलाठ्यांच्या आंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. याबाबत पोलिसांनी ४० ते ४५ जणांविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सिंदखेडराजा तहसील कार्यालयातील गस्तीवर असलेल्या पथकामधील तलाठी यशवंत घरजाळे आणि विष्णू थोरात यांना निमगाव वायाळ येथे नदीपात्रात चार ट्रॅक्टरमध्ये अवैध रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. ते तिथे गेले असता ट्रॅक्टरमध्ये रेती टाकताना निदर्शनास पडले. त्यामुळे पथकाने व्हिडीओ रेकॉर्ड करत कारवाई करून चारही ट्रॅक्टर ताब्यात घेतले. त्यावेळी तेथील ४० ते ४५ मजूर आणि चारही ट्रॅक्टरचे चालक पसार झाले; परंतु थोड्याच वेळाने ते मजूर ट्रॅक्टरजवळ आले. कारवाईच्या भीतीमुळे ट्रॅक्टरचालकाने पथकातील कर्मचारी यशवंत घरजाळे व विष्णू थोरात यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला; तसेच ट्रॅक्टरचा पाठलाग केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. घटनास्थळावरील तीन ट्रॅक्टर पळून गेल्यानंतर चौथे ट्रॅक्टर पळवून नेण्याचा प्रयत्न करतानाच तह-सीलदार सचिन जैस्वाल आणि इतर कर्मचारी व गावकरी घटनास्थळी पोहोचले. एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. तहसीलदार सचिन जैस्वाल यांनी किनगावराजा पोलिस स्टेशनला तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी कलम ३५३, ३७९, ५०६, १४३, १४७, १४९ सहकलम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७), ४८ (८) अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार रमेश गोरे करीत असून फरार आरोप-ींचा शोध घेत आहेत. या भागात अलिकडील काळात रेतीचे अवैध उत्खनन व चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल आहे.

# वन बुलढाणा मिशनचे संदीप शेळके ३ एप्रिलला भरणार उमेदवारी अर्ज...

**जनसंचलन/बुलढाणा**



वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आ-हेत. परिवर्तन रथयात्रेच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हा त्यांनी पिंजून काढला. आता ते लोकसभा उमेदवारीचा अर्ज ३ एप्रिल रोजी दाखल करणार आहेत. वन बुलडाणा मिशनच्या कार्यालयातून एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कष्टकरी, शेतकरी, तसेच तरुणांच्या भवितव्यासाठी संदीप शेळके यांनी लोकसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपण कटीबद्ध असून विकासाच्या मुद्द्यांवर ही निवडणूक लढवणार असल्याचे संदीप शेळके यांनी म्हटल्याचे प्रसिध्दी पत्रकात नमूद आहे. दहा महिन्यांपूर्वी संदीप शेळके यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्धार केला होता. त्यादृष्टीने जिल्हाभर परिवर्तन रथयात्रेच्या माध्यमातून त्यांनी जन-तेशी संवाद साधला. यादरम्यान त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. आता ३ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# नकली सोन्याचे नाणे देऊन शिक्षिकेची केली ९ लाखाने फसवणूक

**जनसंचलन/दुसरबीड**

दुसरबीड पॉलीश केलेले नकली सोन्याची २ किलो नाणी देऊन उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेच्या महिला शिक्षिकेची साडेनऊ लाखाची फसवणूक केल्याची घटना तालुक्यातील जऊळका शिवारात वनविभागाच्या जंगलात सकाळी साडेअकरा वाजेदरम्यान घडली. यामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली असून पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस तीन आरोपीचा शोध घेत आहेत. याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, सिद्धार्थनगर अणदूर ता. तुळजापूर येथील रहिवासी अस-लेली येथील उषाबाई विठोबा झाकडे या उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका आहेत. त्याठिकाणी टोपली मधे झाडांची रोपे विकणाऱ्या सचिन बनसोडे यांच्यासोबत सदर शिक्षेकेची ओळख झाली. त्यावेळी त्याने आम्ही लोणार येथे राहत असून घराचा पाया खोदताना सोने सापडले आहे. आणि ते स्वस्तात विकायचे आहे, असे सांगून सदर शिक्षकेला सुलतानपूर येथे सोने बघण्यासाठी बोलवले. २१ मार्च रोजी सदर शिक्षिका सुलतानपूर येथे येऊन ते सोने बघून त्यांचा सौदा साडेनऊ लाख रुपयांमध्ये झाला. त्यानंतर तीं शिक्षिका सोन्याचे सॅम्पल घेऊन गावाला गेल्यानंतर खरोखरचे सोने असल्याचे खात्री पटल्याने सदर शिक्षिका सोने घेण्यासाठी साडेनऊ लाख रुपये घेऊन सुलतानपूर येथे आली असता सोने विकणारा सचिन बनसोडे यांनी सदर शिक्षकेला जऊळका शिवारात बोलावले ते सर्व गाडीतून जऊळका शिवारात गेले. त्यानंतर उतरून जंगलात गेले त्यावेळी तेथे दोघांनी सदरशिक्षिकेकडून साडेनऊ लाख रुपये मोजून घेतले आणि सोन्याच्या नाणे एका कॅटलीत टाकून तुम्ही इथून लवकर जा असे सांगून त्यांना पाठवून दिले. सदर शिक्षिका सोने घेऊन सिंदखेडराजापर्यंत गेली असता त्यांनी ते सोने तपासून बघितले असता सदर सोने हे नकली दिसल्याने त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. लगेच त्यांनी मागे फिरून किनगाव राजा पोलीस स्टेशन गाठून फसवणूक झाल्याची फिर्याद दिली. त्यामुळे पोलिसांनी सचिन बनसोडे अधिक दोन अनोळ-खी इसम अशा तीन लोकांविरुद्ध अपनं ७६/२०२४ कलम ४२०,३४ भादवी नुसार गुन्हे दाखल केले. पुढील तपास ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुधाकर गवई गणेश डोईफोडे शिवाजी बारगजे करीत आहेत सदर घटना दिवसा साडे अकरा वाजता घडल्याने परिसरात खळबळ उडाली असून कमी पैशात जास्त सोणे घेण्याचा मोह शिक्षिकेला चागलाच आंगलट येवुन महागात पडला असून स्वतः चे साडेनऊ लाख रुपये गमवून बसली आहे गेल्या वर्षी सुद्धा असाच प्रकार या जंगलात घडला होता हे विशेष.

# ४३ आरोपींना अटक, २ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जनसंचलन/ बुलढाणा**




लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्यविक्रीवर कार्यवाही करण्यात येत आहे. १६ ते २७ मार्च दरम्यान जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून ४२ गुन्हे नोंदविण्यात आले. यात ४३ आरोपींना अटक करण्यात आली असून २ वाहनांसह ५ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आचारसंहिता कालावधीमध्ये १६ ते २७ मार्च कालावधीत विशेष मोहीम राबवून ४२ गुन्हे नोंदविण्यात आले. जिल्ह्यात बंद पडलेले गोडाऊन, मंगल कार्यालये, हातभट्टी निर्मिती आणि जागा मालक, हातभट्टी विक्री, अवैध ताडी निर्मिती विक्री जागामालक, धाबे हॉटेल जागामालक, गुन्हाळ चालविणारे, रिकाम्या बाटल्या आणि व्यावसायिक, ट्रॅव्हल्स, बस व्यावसायिक, केमिकल व्यापारी यांना ३६० नोटिस बजावण्यात आली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने सीमा तपासणी नाक्यावर जळगाव जामोद तालुक्यातील निमखेडी आणि हनवतखेड येथे विभागाकडून तात्पुरते चेकपोस्ट तयार करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्ग, तसेच विविध जिल्ह्यात जाणाऱ्या ट्रॅव्हल्स यांची वेळोवळी भरारी पथकामार्फत तपासणी करण्यात येत आहे. जिल्ह्यात अवैध मद्य विक्री अथवा बनावट मद्य निर्मिती आढळल्यास तत्काळ माहिती कळवावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीची आचार संहिता लागताच राज्य उत्पादन शुल्क विभागही सक्रीय झाला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958